Annex - 12

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे यांचे कार्यालय,
जुनी पी.एम.टी. इमारत, स्वारगेट, पुणे -३७

प्र.ज.टोसरे,
मुख्य वनसंरक्षक

अर्ध शासकीय पत्र क्र. कक्ष-३/तांस/3EE /सन २००५-०६.
पुणे - ४११०३७, दिनांक 93/१०/२००५

विषय - अशासकीय संस्था व खाजगी क्षेत्रामार्फत अवनत क्षेत्रावर वनीकरण..
श्री प्रीकोटेड स्टिल लि. सणसवाडी ता. शिरुर.

संदर्भ - आपले कार्यालयाकडील आंग्लभाषेतील अ.शा. पत्र क्र. कक्ष-१७/एनसी/आरएस/९७९, दिनांक ६.९.२००५

प्रिय

अशासकिय संस्था व खाजगी क्षेत्रामार्फत अवनत वनक्षेत्रावर वनीकरण या कार्यक्रमाबाबतच्या केंद्र शासनाकडील पत्र क्र. ८२१/९६, दिनांक ७ जुन, १९९९ अनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदरच्या मार्गदर्शक सुचना प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा., नागपूर यांनी त्यांचेकडील अर्ध शासकिय पत्र क्र. १५/१४, दिनांक ३१ जानेवारी, २००२ नुसार या कार्यालयास पाठविल्या होत्या. सदरच्या पत्रात या योजनेस जास्तीत जास्त प्रसिध्दी देवुन योजना राबविणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्याही सुचना होत्या. याबाबत तत्कालीन वनसंरक्षक, प्रादेशिक, पुणे यांनी दि. ५/६/२००२ रोजी स्वत: पुणे येथे विषयांकित प्रकरणी सभा घेवुन सदरची योजना राबविणेकामी सकारात्मक प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसेच विषयांकित प्रकरणी करीत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी श्री. कन्वरजित सिंह, तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान), म.रा., नागपूर यांचे अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. त्यानुसार दिनांक १३ व १४ फेब्रुवारी, २००२ रोजी श्री. कन्वरजित सिंह, तत्कालीन मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान), म.रा., नागपूर यांनी सभा आयोजित करुन आढावा घेतला होता. त्यांनी प्रकरणी होत असलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त करून सदर योजना राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक १७ व १८ मे, २००२ रोजी तत्कालीन मा. मंत्री (वने), म.रा., मुंबई यांनीही वरिष्ठ वनाधिकाऱ्यांची सभा घेवुन वनीकरणासाठी निधी उपलब्ध नसल्याने, सदरची योजना राबविणेकामी जास्तीत जास्त प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने विभागीय स्तरावरून केलेल्या प्रयत्नानुसार श्रीप्रिकोटेड स्टिल लि. या संस्थेने योजना राबविण्यास सहमती दर्शविली. विषयांकित प्रकरणी शासनाकडून करारनामा, व तद्अनुषांगीक बाबी

Attested
Desk Officer

याबाबत कोणतेही मार्गदर्शन तथा सुस्पष्ट सुचना नव्हत्या. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१/तांस/सवस/३४०४, दिनांक १०.१२.२००२ अन्वये (सोबत छायांकित प्रत सहपत्र १ म्हणून सादर करीत आहे.) उपवनसंरक्षक, जुन्नर यांना सदर संस्था केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व अटींची पुर्तता करीत असल्यास, त्यांचेशी आपले अधिकार कक्षेत विभागीय स्तरावर त्रिपक्षीय करारनामा करुन कराराप्रमाणे प्रस्तावाची अंमलबजावणी त्यांचे जबाबदारीवर व नियंत्रणाखाली करुन घेण्यास अनुमती प्रदान करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेमार्फत क्र. १४५१/३६/३७/२००३, दिनांक २४.४.२००३ अन्वये त्रिपक्षीय करारनामा, श्रीप्रिकोटेड स्टिल लि., व अशासकिय संस्था - श्रीमती संजुबेन शामलजी अजमेरा ट्रस्ट यांचेमध्ये करण्यात आला. सदरच्या त्रिपक्षीय करारनाम्याची छायांकित प्रत सोबत सहपत्र २ म्हणून सादर करीत आहे.

२.०० कंपनीस कराराद्वारे हस्तांतरीत करण्यात आलेले क्षेत्र हे १९९९ पर्यंत महसुल विभागाच्या ताब्यात होते व दिनांक २४.२.१९९९ रोजी वनविभागाचे ताब्यात आलेले आहे. सदरच्या क्षेत्रावर सन १९९९ पुर्वी वनविभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने, हे क्षेत्र पडीक होते. प्रस्तुत क्षेत्र अत्यंत मुरमाड, काही ठिकाणी मृदू खडक व कठीण खडक व अत्यंत अनुत्पादक अशा स्वरुपाचे असे आहे. सदरच्या क्षेत्राशेजारीच शिरुर औद्योगिक क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र सन १९९९ मध्ये वनविभागाच्या ताब्यात येणेपुर्वीपासुन क्षेत्रातुन एक कच्चा रस्ता जात असुन, तो वापरात होता, व त्याचा वापर नगर रोड इंडस्ट्रिज असोशिएशन चे सभासद असलेल्या तीन ते चार संस्थामार्फत कच्चा व पक्का माल वाहतुकीसाठी करण्यात येत होता. सदरची जमीन (अतिक्रमण विरहीत) वनविभागाचे ताब्यात आल्यानंतर वनविभागामार्फत सदरचा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्याबाबतचा उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडुन प्राप्त झालेल्या (संबधित औद्योगिक संस्थांकडुन तसेच तहसिलदार, शिरुर यांचेकडून) पत्र व्यवहाराच्या छायांकित प्रती सोबत सादर करण्यात येत आहेत. (सहपत्र ३ ते ८). यातील एका कंपनीचे प्रतिनिधी श्री. प्रविण संघवी यांनी उपवनसंरक्षक, जुन्नर यांचे विरोधात रस्ता वापरास अनुमती देत नसलेमुळे पुणे येथील सिव्हील कोर्टात केस क्र. १०५९/२००५ नुसार दावा दाखल केलेला आहे.

३.०० आपण निर्देशित केलेनुसार मी दिनांक २७.९.२००५ रोजी प्रस्तुत प्रकरणातील हस्तांतरीत करण्यात आलेल्या, जुन्नर वनविभागातील शिरुर वनक्षेत्रात असलेल्या मौ. कोरेगांव भिमा येथील गट क्र. ६७४ ते ६७९ मधील ३५ हेक्टर वनक्षेत्राची पाहणी केली. सदर करारनाम्यातील मौ. कोरेगाव भिमा येथील १०२.०७ हेक्टर वनक्षेत्र हे खंड अ, ब, क अशा तीन भागात विभागलेले आहे. यापैकी खंड ब मधील वनक्षेत्र प्रकरणातील वनीकरण कामासाठी हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर खंड ब मधील पाहणीच्या वेळी उपवनसंरक्षक, जुन्नर, सहा. वनसंरक्षक, व इतर क्षेत्रीय अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते. या क्षेत्रीय पाहणीचे अनुषंगाने, उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-५/जमीन/९७९, दिनांक २९.९.२००५ अन्वये या कार्यालयास सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. सदर पत्राची प्रत सोबत सहपत्र ९ म्हणून जोडून सादर केली आहे. उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी सादर केलेला अहवाल आणि मी केलेली क्षेत्रीय पाहणी याचे अनुषंगाने, आढळून आलेल्या बाबी, खालीलप्रमाणे आहेत.

Attested K.S.

४.०० सदरचे क्षेत्र वनविभागाचे ताब्यात आल्यानंतर विभागामार्फत व संबंधित कंपनीमार्फत करण्यात आलेल्या उपचार कामाचा व रोपवनाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

४.१ माझे पाहणीचे वेळी श्रीप्रिकोटेड स्टिल लि. यांचे रोपवनासाठी नियुक्त केलेले प्रतिनिधी श्री. मारुती आवळे यांची भेट झाली. कंपनीने त्यांचे मदतीस २० ते २५ मजुर दिलेले असुन त्यांचेमार्फत करारांतर्गत हस्तांतरीत करण्यात आलेल्या वनजमीनीवर रोपे लावणे, आळे करणे, रोपांना पाणी देणे, औषधे व किटकनाशकांची रोपांवर फवारणी करणे, बेणणी करणे, रोपांचे संरक्षण करणे तसेच रोपांची सरळ वाढ होण्याचे दृष्टीकोनातून वेळोवेळी वेड्यावाकड्या वाढलेल्या फांद्यांची छाटणी करणे (Trimming) इ. कामे करण्यात येत आहेत / आलेली आहेत. कंपनीने रोपवनाच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून काटेरी तारेचे कुंपणही घातलेले आहे.

E

४.२ सन १९९९ मध्ये महसुल विभागाकडून ताब्यात घेताना, प्रस्तुत क्षेत्र अत्यंत अनुत्पादक असल्याने त्यात वृक्ष लागवड न करता सन २००० मध्ये कृत्रिम पुर्ननिर्मीती योजनेअंतर्गत ३० हेक्टर वनक्षेत्रावर एकुण ३१२५० र.मी. जलशोषक चर खोदाईचे काम (WAT) करून त्यावर बी पेरणी करण्यात आलेली होती.

F

४.३ सदरचे क्षेत्रात जेथे थोडीफार मातीची खोली आहे, अशा ठिकाणी काही प्रमाणात हिवर, सुबाभुळ (बाजुच्या क्षेत्रातील जुन्या झाडांपासून वाऱ्यामुळे बी पडून निर्माण झालेले), बाभुळ, तरवड, बोर इ. प्रजातीचा नैसर्गिक झाडोरा आढळला. सन २००० मध्ये करण्यात आलेल्या बी पेरणीपासून निम, बाभुळ, ग्लेरिसिडीया, शिरस, शिसू, खैर इ. प्रजातीची रोपे उगवली असुन त्यांची वाढ झालेली आढळले.

G.

४.४ कंपनीने सदरच्या क्षेत्रात मोकळ्या राहिलेल्या व प्रामुख्याने उजाड जागेवर पिंपळ, वड, साग, गुलमोहर, कवठ, चिंच, आवळा, बेल इ. रोपांची लागवड केलेली असुन रोपे चांगल्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसुन आले. तसेच कंपनीने प्रामुख्याने चिंच प्रजातीच्या बीयांची पेरणी केलेली असुन त्यापासुनही रोपे उगवली असल्याचे आढळले. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुस पाम प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. सोबत वनक्षेत्रावर दिनांक २५.९.२००५ रोजी अस्तित्वात असलेल्या झाडोऱ्याबाबतची सद्यस्थिती दर्शविणारा तक्ता (सहपत्र १०) व छायाचित्रे सोबत सादर करीत आहे.

I

४.५ क्षेत्राचे तपासणीचे वेळी एक चौथरा बांधला असल्याचे निदर्शनास आले. विचारणा केली असता, सदरचा चौथरा कंपनीने जाहिरात फलक उभारण्यासाठी तयार केला असल्याचे समजले. ह्या बाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-३/तांस/२१८९, दि. १०/१०/२००५ अन्वये उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असुन, सदरचा अहवाल प्राप्त होताच त्यानुसार आपले कार्यालयास अवगत करण्याची तजवीज ठेवली आहे.

Attested
K.S. [signature]
... Officer
Princ... of Forests.

५.०० आपण आपले उपरोक्त संदर्भीत पत्रात सुचित केलेनुसार सदरच्या क्षेत्रातील रस्त्याबाबत विचारणा केलेली असुन त्याबाबतचा मुद्येनिहाय अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

५.१ विवादीत रस्त्यावरुन माझे पाहणीचे वेळी दुचाकी, तीनचाकी तसेच हलक्या चारचाकी वाहनांची वाहतूक चालू असल्याचे निदर्शनास आले. अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याचे पाहणीचे वेळी दिसुन आले नाही. सदरच्या क्षेत्रात ह्यापुढे अवैध प्रकार होवु नये याकरीता तेथे वनरक्षक दिवसभर हजर असतो. तसेच संबंधित वनपालही दिवसातून एक ते दोन वेळेस सदरच्या क्षेत्राची फिरती करीत असतो असे समजले. डिग्रजवाडी ग्रामस्थ, तसेच तेथील कंपन्यांकडून जवळचे पोहोच क्षेत्र म्हणून व पड असल्याने अधिकृत वहिवाट करत आलेले आहेत. याच वहिवाटीचा कंपनीने तपासणी रस्ता म्हणून तीन मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित केलेला होता. तथापि, वनविभागामार्फत करण्यात आलेल्या उपचार कामांचे वेळी सदर रस्त्याचा वापर वनविभागामार्फत करण्यात आला होता. तसेच संस्थेमार्फत रोपांना पाणी देण्यासाठी, रोपवनाच्या देखभालीसाठी वाहनांची वाहतूक झालेली असल्याने सदरच्या रस्त्याची रुंदी वाढली गेली असल्याचे उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी त्यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. व/कक्ष-५/जमीन/९७९, दि. २९/०९/२००५ अन्वये या कार्यालयास सादर केलेल्या अहवालामध्ये नमुद केले आहे. सदरचा रस्ता हा सिमेंट पिलर व चर खोदुन तीन मीटर रुंदीपर्यंत सिमीत करण्यात आलेली आहे. सोबत त्याची छायाचित्रे सादर करण्यात येत आहेत.

५.२ तसेच सदरचे क्षेत्रात कंपनीने रोपवनासाठी आवश्यक असलेले साहित्य ठेवण्यासाठी एका पक्क्या शेडचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले. तथापि, उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी दिनांक २७.३.२००५ रोजी सदरची शेड ताब्यात घेतली असुन त्यात वनरक्षक, करंदी नाका स्थापन केलेला आहे.

६.०० तसेच आपले पत्रात सदरच्या कंपनीने त्यांचेकडील राडारोडा वनक्षेत्रात टाकला आहे किंवा काय? याबाबत अहवाल सादर करणेबाबत सुचित केलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

६.१ कंपनीने हस्तांतरीत क्षेत्रामध्ये वनक्षेत्राबाहेरुन दगड आणुन टाकला असुन त्याचा वापर वन विकासाच्या कामाच्या दृष्टीने बांधलेल्या दोन माती बंधाऱ्याच्या पिचींगसाठी करण्यात आला आहे. यातील काही दगड अजुनही क्षेत्रात पडलेले दिसुन येतात. ह्या दगडांचा प्रस्तावित बांधाचे पिचिंगसाठी वापर करण्यात येणार असल्याचेही समजले.

६.२ तळ्याच्या भरावावर दगडाचे पिचिंग करुन त्यावर घायपात व कोरफड कंदांची लागवड केली आहे. सदरच्या दोन्ही बंधाऱ्यात पाणी साठले आहे. तार कंपाऊंडमुळे सदर क्षेत्रामध्ये अनाधिकृत चराईस आळा बसल्याने गवताची वाढ चांगली झाली

Attested

Desk Officer
O/o the
Principal Chief Conservator of Forests

आहे. तसेच जलसंधारणाच्या कामांमुळे परिसरातील जलस्तर वाढला असुन, त्यामुळे अत्यंत अनुत्पादक जमीनीवरही हिरवळ पहावयास मिळत आहे. सोबत छायाचित्रे सादर करीत आहे.

७.०० आपले पत्रातील परिच्छेद क्र. ५ नुसार सदरचा करानामा १० वर्षांसाठीच करण्यात आला किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

७.१ दिनांक २४ एप्रिल, २००३ रोजी करण्यात आलेला त्रिपक्षीय करारनामा हा करारनाम्यातील परिच्छेद क्र. ३ नुसार दिनांक १.४.२००३ पासुन १० वर्षांसाठी करण्यात आलेला होता. सोबत करारनाम्याची छायांकित प्रत सादर करण्यात येत आहे. (सहपत्र ११). त्यामुळे सदर कंपनी अनिश्चित कालावधीसाठी सदरच्या वनजमीनीवर त्यांचा हक्क सांगणार नाही असे उपवनसंरक्षक, जुन्नर यांचे अहवालावरून स्पष्ट होते.

७.२ तसेच शासन पत्र क्र. एफएलडी-१२०२/प्र.क्र. १६८/फ-१०, दिनांक २५.५.२००४ अन्वये शासनाने कोल्हापूर मधील वारणा उद्योग समुहाने केलेल्या कराराच्या धर्तीवर या योजनेअंतर्गत करारनामा करणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत. त्याअनुषंगाने उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून प्राप्त झालेला (७ वर्षांसाठीचा), वारणा उद्योग समुहाच्या धर्तीवरील प्रारूप त्रिपक्षीय करारनामा आपलेकडे या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/तांस/१२४, दिनांक ७.५.२००५ अन्वये पुढील कार्यवाहीस्तव मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा., नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सोबत सदरच्या पत्राची छायांकित प्रत सहपत्र १७ म्हणून सादर करीत आहे.

७.३ श्रीप्रिकोटेड स्टिल लि., सणसवाडी यांनी प्रस्तुत वनजमीनीवर शेडचे बांधकाम, रस्त्याचा वापर व विकसन आराखड्यास मंजुरी न घेता काम चालू करणे, या बाबींचा अवलंब करून करारनाम्यातील अट क्र. ५ब व अट क्र. ७ चा भंग केलेला असल्याने, उपवनसंरक्षक, जुन्नर यांनी संबंधित कंपनीस त्यांचेशी केलेला करारनामा रद्द का करण्यात येवु नये, अशा स्वरूपाची नोटीस उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडील क्रमांक ब/कक्ष-५/जमीन/१२६८, दि. २६.०९.२००५ अन्वये, (सहपत्र -१८) बजावलेली असुन, संस्थेकडून स्पष्टीकरण १५ दिवसात मागविण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन स्पष्टीकरण प्राप्त होताच त्याअनुषंगाने अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना क्र. ६ मध्ये 'स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करावी' असे नमुद असतानाही पाम जातीच्या वृक्षांची लागवड कंपनीने केलेली असुन परिच्छेद क्र. ४.५ मध्ये नमुद केले प्रमाणे एक चौथराही बांधण्यात आलेला आहे. ह्या बाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-३/तांस/२१८९, दि. १०/१०/२००५ अन्वये उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असुन, सदरचा अहवाल प्राप्त होताच त्यानुसार आपले कार्यालयास अवगत करण्याची तजवीज ठेवली आहे.

Attested

Desk Officer
the
Principal ... ator of Forests.

७.४ सदरची कामे कोणत्या कालावधीत झाली व त्यास वेळीच प्रतिबंध का केला नाही, याबाबत उपवनसंरक्षक, जुन्नर यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३/तांस/२१८९, दिनांक १०.१०.२००५ अन्वये विचारणा करण्यात आलेली आहे. उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून अहवाल प्राप्त होताच सादर करण्याची तजवीज ठेवीत आहे.

८.०० आपण उपरोक्त संदर्भीत पत्रात सुचित केलेनुसार संबंधित कंपनीची संस्था नोंदणी व ट्रस्टडीडची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे. **(सहपत्र - १३)**. तसेच फर्म नोंदणी व पार्टनरशिप डीड संबंधितांकडून प्राप्त करून घेण्यात येत असुन, ते या कार्यालयास प्राप्त होताच सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

९.०० वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता, तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग झाला नसल्याचे स्पष्ट होत आहे. वास्तविक केंद्र शासनाने वनीकरणासाठी असलेल्या निधीचा अपुरेपणा / कमतरता या बाबींमुळे वनीकरणाचे उद्दिष्ट साध्य होत नसल्याने, सदरची योजना राबविणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्याअनुषंगाने तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना, अर्ध शासकिय पत्र, स्मरणपत्रे या आधारानेच सदरचा त्रिपक्षीय करारनामा करण्यात आलेला आहे. ज्या जमीनीवर गवत सुध्दा उगवत नव्हते अशा प्रकारच्या अत्यंत अनुत्पादक जमीनीवरही सध्या झाडोरा अस्तित्वात असुन, हिरवळ दिसुन येते, त्यामुळे प्रकरणी सदरच्या कंपनीचा यात काही वेगळा दृष्टीकोन (vested interest) असेल, असे खचितच वाटत नाही. त्यामुळे विषयांकित प्रकरणी तत्कालीन उपवनसंरक्षक, जुन्नर यांचेवर आरोपपत्र दाखल केले गेल्यास, खाजगी संस्थांमध्ये च वनविभागातही योजना राबविणेबाबत प्रतिकुल संदेश जावु शकतो, असे मत आहे.

प्रकरणी शासनाकडून या कार्यालयास नस्ती / अहवाल सादर करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तथापि, शासनास नस्ती / अहवाल सादर करण्यात आलेला नाही. सदरचा अहवाल आपणाकडे दोन प्रतीत सादर करण्यात येत आहे. कृपया आपले मार्फत सदरचा अहवाल शासनास सादर होणेस विनंती आहे.

आपले अवलोकनार्थ तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपला

प्र. ज. ठोसरे

**( प्र. ज. ठोसरे )**

**श्री ज.ना. सक्सेना**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

Attested

K.S. ...

...Officer
...the
Principal ... ...ator of Forests,
Maharashtra State, Nagpur